REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# "अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचा तुलनात्मक अभ्यास"

*डॉ. गुणवंत सोनोने*

**सारांश :**

प्रस्तुत संशोधनाचे उद्देश 1) अनु. जातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे. 2) अनु. जमातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे 3) अनु. जाती व अनु. जमातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे, निर्धारित करण्यात आले. आणि अनु. जाती व अनु. जमातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेमध्ये फरक असते, ही परिकल्पना निश्चित करण्यात आली. प्रस्तुत संशोधनाकरिता वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीची निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधन शाळेसी संबंधित असल्याने शालेय सर्वेक्षण पद्धतीची निवड करण्यात आली प्रस्तुत संशोधनाकरिता सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीचा उपयोग न्यादर्श निवडीकरिता करण्यात आला. प्रस्तुत संशोधनाकरिता यवतमाळ जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनु.जाती व अनु. जमातीतील ग्रामीण व शहरी भागात वास्तव्यास असलेले ४०० विद्यार्थ्यांची (मुल व मुली) न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली. प्रस्तुत संशोधनाकरिता डॉ यशवीर सिंह आणि डॉ. महेश भार्गव यांची 'भावनिक परिपक्वता चाचणी' चा उपयोग करण्यात आला. प्रस्तुत संशोधनाकरिता डॉ यशवीर सिंह आणि डॉ. महेश भार्गव यांच्या 'भावनिक परिपक्वता चाचणी' च्या सहाय्याने उच्च प्राथमिक शाळेतील ग्रामीण व शहरी भागात वास्तव्यास असलेले अनु. जाती व अनु. जमातीतील ४०० विद्यार्थ्याद्वारे (मुल व मुली) माहिती संकलित करण्यात आली. संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्याकरिता मध्यमान, प्रमाण विचलन, 't' मूल्य या प्रगत सांख्यिकीय तंत्राचा अवलंब करण्यात आला त्याआधारे पुढील निष्कर्ष मांडण्यात आले. 1) शहरी भागातील अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांचे भावनिक दमन या घटकात समानता आहे. तर भावनिक अस्थिरता, सामाजिक कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन, नेतृत्वहिनता यात सार्थक फरक आढळला. 2) शहरी भागातील अनु. जातीतील विद्यार्थ्यांपेक्षा अनु. जमातीतील विद्यार्थ्यांत भावनिक अस्थिरता, सामाजिक, कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन, नेतृत्वहिनता अधिक प्रमाणात आहे. 3) शहरी भागातील अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेत सार्थक फरक आढळून आला. 4) शहरी भागातील अनु. जातीतील विद्यार्थ्यांपेक्षा अनु. जमातीतील विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता अधिक आहे.

**पारिभाषिक शब्द :** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ग्रामीण, शहरी, विद्यार्थी, भावना, परिपक्वता, भावनिक परिपक्वता.

## प्रस्तावना :

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय ! विकासाकरिता परिपक्वतेचे महत्व अनन्यसाधारण आहे. व्यक्तीमध्ये परिपक्वता नसेल तर विकासाची गती मंद होते. विद्यार्थ्यांच्या संदर्भात ज्ञानात्मक, भावनात्मक व क्रियात्मक क्षेत्रात विकास अभिप्रेत आहे. या तिन्ही क्षेत्रातील विकासात परीपक्वतेचे स्थान महत्वपूर्ण आहे. परिपक्वतेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर यथायोग्य परिणाम होत असलेला दिसून येतो शारीरिक, मानसिक, सामाजिक परिपक्वतेबरोबरच भावनिक परिपक्वतेचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर परिणाम होतो. कौमार्यावस्थेचा काळ व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासातील महत्वपूर्ण काळ मानला जातो. या काळात अनेक शरीर-मानस बदलामुळे अनेक परिवर्तन व्यक्तिमत्वामध्ये घडतात. चिंता, तणाव, नैराश्य, भावनिक अस्थैर्य इ. समस्या निर्माण होतात. ग्रामीण व शहरी भागातील वातावरणाचाही परिणाम होतो. प्रामुख्याने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांच्याभावनिक परिपक्वतेचा तुलनात्मक अभ्यास कौमार्यावस्थेमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संदर्भात करणे गरजेचे आहे कारण अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक पार्श्वभूमीचाही प्रभाव भावनिक परिपक्वतेवर होत असलेला दिसून येतो.



### भावनांचा अर्थ (Meaning of Emotion) -

पी. डी. यंग के अनुसार, 'यह सम्पूर्ण व्यक्ति में तीव्र विघ्न उत्पन्न करने वाला है जिसका उद्गम मनोवैज्ञानिक है तथा जिसमे व्यवहार तथा चेतना तथा अंतरावयव की क्रियाँए शामिल रहती है ।

वूडवर्थ के अनुसार 'संवेग व्यक्ति की उत्तेजित दशा है ।'

### परिपक्वतेचा अर्थ (Meaning of Maturaty) –

हरलॉक (1981) च्या मते, 'व्यक्तीच्या आनुवंशिक गुणाचे यथाकाल प्रगटीकरण होणे हे परिपक्वन होय.'
मॅकॅडलेस (Macandless 1961) च्या मते, 'कालपरत्वे किंवा वयानुसार व्यक्तीचा विकास होत जाणे म्हणजे परीपक्वन होय.'

### भावनिक परिपक्वता (Emotional Maturaty) -

"An Adult level of emotional control and expression as opposed to children emotional behavior." - Encyclopedic Dictionary of psychology

"भावनांना योग्यप्रकारे वाव देवून त्यांना योग्य प्रमाणात प्रदर्शित करणे, यालाच भावनिक परिपक्वता म्हणतात." "आयुष्यातील कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाण्याची भावनिक सिद्धता म्हणजे भावनीक परिपक्वता होय."

### अनुसूचीत जाती-

ब्रिटीश संसदेने भारतीय शासन विषयक इ.स. 1935 चा जो कायदा संमत केला, त्यात 'अनुसूचित जाती' हा शब्दप्रयोग प्रथम वापरण्यात आला. भारतीय घटनेच्या कलम 341 नुसार, "ज्या जाती, वंश वा जनजाती अथवा जाती याचे भाग अथवा त्यातील गट यांचा अनुसूचित जाती म्हणून उल्लेख केला असेल, त्याच सामाजिक गटांना 'अनुसूचित जाती' असे मानले जाईल."

### अनुसूचीत जमाती-

"भारतीय राज्यघटनेच्या कलम 342 (1) नुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या जमातींना 'अनुसूचित जमाती' असे संबोधले जाते. यात सर्वसाधारणपणे एकाकी, डोंगरावर व जंगलात राहणारे व ज्यांना आधुनिक संस्कृती व जीवन पद्धतीचा जवळजवळ परिचय होवू शकला नाही अशांचा समावेश आहे. गिरीजन व आदिवासी अशा नावानेही ते ओळखले जातात. महाराष्ट्रातील हलबा, वारली, गोंड अशी या ठळक गटाची नावे आहेत.

### संशोधन विषयाची गरज व महत्व -

अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास करणे उपयुक्त आहे. कौमार्यावस्थेतील अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेच्या अभ्यासाद्वारे त्यांच्यातील भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करता येते. कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता कितपत विकसित झाली. यांच्या मापनाच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्वपूर्ण आहे. भावनिक परिपक्वतेचा विद्यार्थ्याच्या शैक्षणिक संपादनावर होणाऱ्या परिणामाचे परीक्षण करता येते. अनु. जाती व अनु. जमाती हा समाजघटक सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने आजतागायत वंचित होता. त्याचा परिणाम त्याच्या भावनिक परिपक्वतेवर कितपत होतो याचा पडताळा पाहण्यात येते.

एकंदरीत प्रस्तुत संशोधन हे अनु जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन, व्यक्तिमत्व विकासावर भावनिक परिपक्वतेचा होणारा परिणाम अभ्यासण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचेही तुलनात्मक मापनाद्वारे भावनिक परिपक्वतेच्या विकासाकरिता कौटुंबिक, शालेय, सामाजिक वातावरण कसे असावे, सहशालेय उपक्रम कोणते राबवावे, याद्वारे भावनिक परिपक्वतेच्या विकासाकरिता उपयुक्त उपाययोजना राबविण्याकरिता उपयुक्त ठरते

तात्पर्य, प्रस्तुत संशोधन मानसशास्त्रीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उपयुक्त व महत्वपूर्ण ठरेल, असे संशोधकाचे प्रामाणिक मत आहे

### संशोधनाची उद्दिष्ट्ये -

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निर्धारित करण्यात आली

i. अनु. जातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे
ii. अनु. जमातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे
iii. अनु. जाती व अनु. जमातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे

### संशोधनातील चले -

प्रस्तुत संशोधनात खालील चलांचा विचार करण्यात आला

अ) स्वाश्रयी चल : भावनिक परिपक्वता
आ) आश्रयी चल : अनु.जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांचे प्राप्तांक.

### परिकल्पना -

प्रस्तुत संशोधनातील परिकल्पना पुढीलप्रमाणे-
अनु. जाती व अनु. जमातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेमध्ये फरक असते.

### गृहीतके -

1. अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा शैक्षणिक संपादनावर परिणाम होतो.
2. भावनिक परिपक्वतेचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर परिणाम होतो.

### संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा -


प्रस्तुत संशोधनाकरितासंबंधित साहित्याचा व संशोधकांच्या24 पूर्व संशोधनाचा आढावा घेण्यात आला

### संशोधन पद्धतीची निवड-

प्रस्तुत संशोधन यवतमाळ जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनु.जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा तुलनात्मक अभ्यास असल्यामुळे या विद्यार्थ्यांना भावनिक परिपक्वता चाचणी घेवून माहिती संकलन करण्यात आले. अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा ग्रामीण व शहरी भागाच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास होणे आवश्यक आहे ही समस्या शालेय स्तरावरील असून याबाबत सद्यास्थिती जाणून घ्यावयाची असल्यामुळे शालेय विद्यालय सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

### न्यादर्श -

प्रस्तुत संशोधनासाठी यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ, नेर, दारव्हा, दिग्रस, पुसद, उमरखेड, आर्णी, महागांव, घाटंजी, कळंब, बाभूळगाव, राळेगांव, पांढरकवडा, वणी, मारेगांव, झरी जामणी या 16 तालुक्यांपैकी 10 तालुक्याची निवड करण्यात आली. या 10 तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातून एका ग्रामीण व एका शहरी शाळेची निवड करण्यात आली. ग्रामीण भागातून 10 शाळा व शहरी भागातून 10 शाळाची निवड करण्यात आली. 10 तालुक्यातून उच्च प्राथमिक शाळेतील शैक्षणिक सत्र 2007-2008 इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या 200 अनु. जाती व 200 अनु. जमातीतील असे एकूण 400 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.




### संशोधनाची साधने -


प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनाकरिता डॉ यशविर सिंह आणि डॉ. महेश भार्गव द्वारा प्रमाणित 'भावनिक परिपक्वता चाचणी (Emotional Maturity Scale - EMS)' चा उपयोग करण्यात आला.

### माहिती संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन -

प्रस्तुत संशोधनाकरिता डॉ यशविर सिंह आणि डॉ. महेश भार्गव द्वारा प्रमाणित 'भावनिक परिपक्वता चाचणी' च्या सहाय्याने उच्च प्राथमिक स्तरातील ग्रामीण व शहरी भागात वास्तव्यास असलेले अनु.जाती व अनु.जमातीतील ४०० विद्यार्थ्यांद्वारे (मुल व मुली) माहिती संकलित करण्यात आली. संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्याकरिता मध्यमान, प्रमाण विचलन, 't' मूल्य या प्रगत सांख्यिकीय तंत्राचा अवलंब करण्यात आला

**सारणी क्र. 1**
**शहरी भागातील अनु. जाती व जमातीतील विद्यार्थ्यांची ‘भावनिक परिपक्वता’ दर्शविणारी सारणी**

| गट | न्यादर्श | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधिनता मात्रा | प्रमाण त्रुटी | मध्यमानातील फरक | प्राप्त‘t’ मूल्य | सारणी ‘t’ मूल्य | सार्थकता स्तर | सार्थक आहे/नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शहरी अनु. जाती | 100 | 116.33 | 25.23 | 198 | 3.82 | 10.38 | 2.712 | 1.96 | 0.05 | सार्थक |
| शहरी अनु. जमाती | 100 | 126.71 | 28.77 | | | | | | | |




**आलेख क्र. 1**

**शहरी भागातील अनु. जाती व जमातीतील विद्यार्थ्यांची ‘भावनिक अस्थिरता’ दर्शविणारा आलेख**

वरील सारणी व आलेखावरुन असे निदर्शनास येते की, शहरी भागातील अनु. जातीतील विद्यार्थ्यांचे मध्यमान 116.33 व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांचे मध्यमान 126.71 आहे. मध्यमानातील फरक 10.38 आहे. 198 स्वाधीनता मात्रेकरिता नमुना ‘t’ मूल्य 0.05 स्तरावर 1.96 अपेक्षित आहे. प्राप्त ‘t’ मूल्य 2.712 आहे व ते 0.05 स्तरावर सार्थक आहे.

याचाच अर्थ असा की, शहरी भागातील अनु. जाती व जमातीतील विद्यार्थ्यांच्या ‘भावनिक परिपक्वता’ या घटकात सार्थक फरक आहे.

शहरी भागातील अनु. जातीतील विद्यार्थ्यांपेक्षा अनु. जमातीतील विद्यार्थ्यांची ‘भावनिक परिपक्वता’ अधिक प्रमाणात आहे.

**परिकल्पनेचे परिक्षण**

“अनु. जाती व अनु. जमातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या भावनिक परिपक्वतेमध्ये फरक असते.”

सारणी व आलेखानुसार स्पष्ट होते की, शहरी भागातील अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेत सार्थक फरक आढळला. त्यामुळे परिकल्पनेचा **स्विकार** करण्यात आला.

**निष्कर्ष :**

‘अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचा तुलनात्मक अभ्यास’, या विषयावरील प्रस्तुत संशोधन विषयाचे निष्कर्ष मांडत असतांना उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांकडून डॉ. यशवीर सिंग व डॉ. महेश भार्गव द्वारा प्रमाणित ‘भावनिक परिपक्वता चाचणी’ सोडवून घेण्यात आली व पुढील निष्कर्ष मांडलेले आहे

1. शहरी भागातील अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांचे भावनिक दमन या घटकात समानता आहे. तर भावनिक अस्थिरता, सामाजिक कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन, नेतृत्वहिनता यात सार्थक फरक आढळला.
2. शहरी भागातील अनु. जातीतील विद्यार्थ्यांपेक्षा अनु. जमातीतील विद्यार्थ्यांत भावनिक अस्थिरता, सामाजिक, कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन, नेतृत्वहिनता अधिक प्रमाणात आहे.

**3.** शहरी भागातील अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेत सार्थक फरक आढळून आला.

**4.** शहरी भागातील अनु. जातीतील विद्यार्थ्यापेक्षा अनु. जमातीतील विद्यार्थ्यांची भावनिक परिपक्वता अधिक आहे. ग्रामीण व शहरी भागाबाबत हेमलता तुरणकर (2007) यांच्या "ग्रामीण विद्यार्थ्यापेक्षा शहरी विद्यार्थी हे अधिक प्रमाणात भावनिकदृष्ट्या स्थीर असतात. तर शहरी विद्यार्थ्यापेक्षा ग्रामीण विद्यार्थी अधिक प्रमाणात भावनिकदृष्टया अस्थिर असतात'' या निष्कर्षाशी पूर्णपणे विसंगत आहे

## संदर्भ ग्रंथ :

**मराठी -**

1. आळंदकर जयकुमार ज्ञा., (1975), "अभिनव शैक्षणिक मानसशास्त्र'', पुणे, ठोकळ प्रकाशन.
2. कडके, शिरगावे, शेंडगे, (ऑक्टो. 2006), "अध्ययनार्थीचे मानसशास्त्र आणि अध्यापन प्रक्रिया'', कोल्हापूर, फडके प्रकाशन.
3. कऱ्हाडे बी.एम., (जुलै 2007), "शास्त्रीय संशोधन पद्धती', नागपुर, पिंपळापुरे एण्डपब्लिशर्स.
4. कार्डीले वसंतराव, महाले संजीवनी, (2002) "संशोधनात सांख्यिकीय तंत्राचे उपयोजन', नाशिक, य.च.म.मु. विद्यापीठ.
5. गर्गे स. मा. (संपादक), (1986), "भारतीय समाजविज्ञान कोश खंड - 1'', पुणे, कल्पना मुद्रणालय.
6. गावंडे एकनाथराव, झोंबाडे वर्षा, (2000), "मूल्याधिष्ठित शिक्षण प्रक्रिया आणि उपचार'', अमरावती, निर्मल प्रकाशन.
7. घाटोळ रा. ना., (2003), "समाजशास्त्रिय संधोधन तत्वेप पद्धती'', नागपुर, मंगेश प्रकाशन.
8. घोरमोडे के.यु., घोरमोडे कला, (2008), "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे', नागपुर, विद्या प्रकाशन.
9. जगताप ह.ना., (1991), "शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र'', पुणे, नूतन प्रकाशन.
10. जोशी अनंत, महाले संजिवनी, (मे 2006), "मुक्त विद्यापीठीय संशोधन', संशोधन मार्गदर्शन मालिका, पुष्प पहिले, नाशिक, य.च.म.मु. विद्यापीठ.
11. पंडीत रवी., (जून 2007), "शैक्षणिक मानसशास्त्र'', नागपूर, पिंपळापुरे प्रकाशन एण्डपब्लिशर्स.
12. पारसनिस न.रा., (1992), "प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र'', पुणे, नूतन प्रकाशन.
13. पोखरापुरकर राजा, (2006), "संशोधनासाठी नमुना निवड', संशोधन मार्गदर्शक मालिका,पुष्प 11 वे, नाशिक, य.च.म.मु. विद्यापीठ.
14. भागवतवार प्र.आ., जोगावार व.वि., बोरुडे रा.र., (1976), "समायोजन मानसशास्त्र'', पुणे, विद्यार्थी गृह प्रकाशन.
15. भिंताडे वी.रा., (1989), "शैक्षणिक संशोधन पद्धती', पुणे, नुतन प्रकाशन.
16. मुळे रा. शं. आणि उमाठे वि.तु., (1998), "शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे', नागपूर, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळ
17. शेवतेकर-बडवे शारदा, (सप्टें. 2004), "विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र'', नागपूर, विद्या प्रकाशन.
18. सारंगपाणी मधुसुदन सारंगपाणी सरोजिनी, (1967), "सामान्य मानसशास्त्र'', पुणे, विद्यामंदिर प्रकाशन.
19. सोमवंशी अनिल, (2002), "राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण'', अमरावती, बोके प्रकाशन.
20. सोहनी शं. कृ., (मे 1993), "शैक्षणिक टीपाकोश'', पुणे, हिंदुस्थान मुद्रणालय.

**हिन्दी -**

1. पाठक पी.डी (2006), "शिक्षा मनोविज्ञान'', नागपूर, पिंपळापरे प्रकाशन एण्ड पब्लिशर्स।
2. भटनागर सुरेश, (2001), "शिक्षा मनोविज्ञान'', मेरठ, सूर्या पब्लिकेशन।
3. मंगल एस के., (1975), "शिक्षा मनोविज्ञान'', लुधियाना, प्रकाश ब्रदर्स ऐज्युकेशन पब्लिकेशन।
4. माथुर एस.एस., (1981-82), "शिक्षा मनोविज्ञान'', आगरा, विनोद पुस्तक मंदिर।

**इंग्रजी -**

1. Best J.W. and Khan J. V., (2000), "Research in Education", Prentice hall of India, Pvt. ltd.
2. Bhagi Manjula, Sharma sunita, (1994), "Encyclopedic Dictionary of psychology", New Delhi, Anmol Publication.
3. Buch M.B., "Second survey of Research in Education", (1979), Baroda, Published by Society for Educational Research and Development.
4. Buch M.B., "Third Survey of Research in Education", (1978-1983), New Delhi, Published by N.C.E.R.T.
5. Buch M. B., "Forth survey of Research in Education", Vol. No. 1, (1982-1988), New Delhi, Published by N.C.E.R.T.
6. Buch M. B., "Fifth survey of Research in Education", Vol. No. 1, (1988-1992), New Delhi, Published by N.C.E.R.T.
7. "Six survey of Research in Education', Vol. No. 1, (1993-2000), New Delhi, Published by N.C.E.R.T.
8. Mangal S.K. (2003), "Advanced Educational Psychology", New Delhi, Prentice Hall of India.
9. Roy B.K. "Census of India", Reginal Devision of India, (Cartographic Analysis Occasional Paper) Series 1, Vol. 12, ( 1988) New Delhi, Maharashtra Govt. Of India.
10. Saksena N.R. Sharma B.K. Mohanthy R.K, "Fundamental of Educational Research", Surya Publication, Meerut, 2003.

Singh Yashvir & Bhargava Mahesh, "Mannual for Emotional Maturity scale", (1990), Agra, National Psychology Corporation.